# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार यांचेकार्यालय

रामनगर,सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्र.- ३९ दिनांक २७/०२/२०२१

## तुळींज येथे खाजगी घरातील वेश्या व्यवसायावर अ.मा.वा.शाखा नानासोपारा पथकानी कारवाई करुन पिडीत महिलेची केली सुटका

दिनांक २५/०२/२०२१ तुळींज पोलीस ठाणे हद्दीमध्ये साई बाजार परीसरातील खाजगी घरात वेश्या व्यवसाय चालु असल्याची बातमी सफौ/महेश गोसावी नेम-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक शाखा यांना मिळाली वरुन वपोनि/भास्कर पुकळे यांनी पथकासह नमुद पत्यावर बोगस गिराईक पाठवुन छापा टाकला असता खालील प्रमाणे वेश्या दलाल १) नवलकुमार माथुर यादव, वय-२७ वर्षे २) लल्लन महावीर भुयान, वय २७ वर्षे ३) योगेश रमन ठाकुर, वय-२९ वर्षे ४) चंदन लक्ष्मी चंदनवसी वय-२८ वर्षे सर्व रा. नालासोपारा पुर्व, मुळ रा. झारखंड राज्य यांना ताब्यात घेवुन व एक पीडीत मुलीची सुटका केली. आरोपीत व पिडीतांची फेसबुक वरुन ओळख झाली असुन तेव्हापासुन आरोपी पीडीतचा वेश्या व्यवसायासाठी वापर करित असल्याने आरोपींना अटक करुन आरोपीं विरुध्द तुळींज पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २८२/२०२१ भादवि कलम ३७०, ३४, पीटी ॲक्ट कलम ३, ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ/महेश पाटील, पोलीस उपायुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/भास्कर पुकळे, मपोउपनि/.लक्ष्मी बोरकर, सफौ/ महेश गोसावी , बारकु चित्ते, विक्रम निकम, पोहवा/पद्मने, महीला पोलीस शिपाई/ जगदाळे, पाटील यांनी केली आहे.

-------ooo------